# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेल: arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्र. आरक्षण/ओ-२२/१५१८

दिनांक : ०७/०८/२०१३

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

**विषय : मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचा-यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाहीबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती.**

**संदर्भ : १) शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब,दि. १८ मे,२०१३**
**२) शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब,दि. ३० जुलै,२०१३**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन परिपत्रकांस अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाने मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचा-यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाहीबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती याबाबत शासन परिपत्रक क्रमांक-बीबीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दिनांक ३० जुलै, २०१३ नुसार अंशतः सुधारणा केलेल्या आहेत. सदर शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडलेली आहे.

सबब, शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार व याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
( आरक्षण कक्ष )

सोबतः- वरीलप्रमाणे

G:\pk 2013\Circulars.docx

मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाहीबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती.

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

## शासन परिपत्रक क्रमांकः बीसीसी -२०१२/ प्र. क्र. ३३२/१२/१६-ब

मंत्रालय, मुंबई -४०००३२.

दिनांक : ३० जुलै, २०१३.

<u>वाचा</u> -

१) शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्रमांक १४२०००/प्र.क्र.४३/का.१०, दि. १३.४.२००० (दिनांक २८ मे २००१ च्या शुध्दीपत्रकासह)

२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी १०९९/प्र.क्र.१४/का.१०, दि. १६.८.२०००.

३) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी १०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, ५ मार्च २००५

४) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्र.सीबीसी १०/२०१०/प्र.क्र.४७/मावक -५, दि. २६ मार्च २०१०

५) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्र.सीबीसी १०/२०१०/प्र.क्र.५९०/ मावक -५, दि. ८ जून २०११

६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि. १५ जून,१९९५

७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००४/प्र.क्र.४५/०४/१६-ब, दि. २४ जून,२००४

८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००२/प्र.क्र.९३/०४/१६-ब, दि. ३० जून,२००४

९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००५/प्र.क्र.२८/०५/१६-ब, दि. १५.१२.२००५ (क्र. बीसीसी २०११/प्र.क्र.९२९/११/१६-ब, दि. ७ जानेवारी, २०१२ च्या शुध्दीपत्रकासह)

१०) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००

११) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक,क्र. बीसीसी -२०१२/ प्र. क्र. ३३२/१२/१६-ब, दि. १८ मे, २०१३.

**शासन परिपत्रक -**

शासकीय/ निमशासकीय, इत्यादी कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता, संबंधित जात पडताळणी समितीकडून तपासून घेण्याबाबत वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत. असे असूनही अद्याप अनेक मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी, त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासून घेतलेली नाही.किंवा त्यासंबंधिचे प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर केलेले नाहीत, ही बाब गंभीर आहे. त्यामुळे मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास अनुसरावयाच्या कार्यवाहींसंबंधीच्या सूचना संदर्भाधिन क्र ११ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १८ मे, २०१३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

सदर परिपत्रकाच्या संदर्भात सुधारित सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अंशत: सुधारणा करण्यात येत आहेत.

१. शासन सेवेतील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी आवश्यक त्या परीपूर्ण कागदपत्रांसह प्रस्ताव, संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करण्याची मुदत आता दि. ३० सप्टेंबर,२०१३ पर्यंत राहिल. मात्र त्यानंतर पुढे मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद संबंधित अधिकारी /कर्मचा-यांनी घ्यावी.

२. दिनांक ३०.६.२०१३ पर्यंत सेवा निवृत्त झालेल्या मागास प्रवर्गातील (अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

३. अनुसूचित जमाती प्रवर्गातील दिनांक ३०.६.२०१३ पर्यंत सेवा निवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तथापि, अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दि. १५ जून १९९५ पूर्वी शासन सेवेत नियुक्त झालेल्या व दिनांक १५ जून १९९५ नंतर, अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र नियुक्ती प्राधिकाऱ्याला सादर न करता, दिनांक ३०.६.२०१३ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी /कर्मचाऱ्यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे शपथपत्र व अनुसूचित जमातीचे मूळ जात प्रमाणपत्र, ते ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झालेले आहेत, त्या कार्यालय प्रमुखाकडे दि. ३० सप्टेंबर, २०१३ पर्यंत जमा करावे व त्याबाबतची पोचपावती संबंधित अधिकाऱ्यांकडून घ्यावी.

४. अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या व अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र न देता सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्याच्या वारसाला त्याच्या वडीलांच्या जात प्रमाणपत्राच्या आधारे, अनुसूचित जमाती प्रवर्गातील असल्याचा दावा भविष्यात करता येणार नाही.

सदरहु शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०७३०१७१६२६७५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jayant Kumar Banthia

Digitally signed by Jayant Kumar Banthia
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CS OFFICE, postalCode=400032, st=MAHARASHTRA, cn=Jayant Kumar Banthia
Date: 2013.07.31 15:03:48 +05'30'

**(जयंतकुमार बाँठिया)**
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
३. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मुख्य सचिव,
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
७. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्व जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना तसेच जात प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांना उपरोक्त विषयासंदर्भातील परिपत्रकांमधील सूचनानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
८. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्व जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना तसेच जात प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांना सदर परिपत्रकाची प्रत पाठवून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.
९. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की जात प्रमाणपत्र देण्यास सक्षम असलेल्या त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांना उपरोक्त विषयासंदर्भातील परिपत्रकांमधील सूचनानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१३. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१४. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१५. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१८. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,

१९. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२०. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२१. संचालक, समाजकल्याण, पुणे,
२२. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२३. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२४. संचालक, सेवायोजन, मुंबई,
२५. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
२६. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२९. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३०. सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर परिपत्रकाची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३१. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३२. निवड नस्ती, कार्यासन १६-ब.